लोकमत

# महिलांना परसबाग बियाण्याचे वाटप

## कृषी विज्ञान केंद्राचा उपक्रम : महिलांसाठी घेतली न्युट्री थाली स्पर्धा

लोकमत न्यूज नेटवर्क

**धुळे** :राष्ट्रीय पोषण महा अंतर्गत धुळे येथील कृषी विज्ञान केंद्रातर्फे पिंपळगाव (ता. साक्री) येथील १०० महिलांना परसबाग बियाण्याचे वाटप करण्यात आले.

पंचायत समिती सदस्य रमेश गांगुर्डे यांच्याहस्ते हे बियाणे वाटप केले.

यावेळी न्युट्री थाली स्पर्धेत महिलांनी त्यांनी अवलंबिलेल्या पीक पद्धतीत येणाऱ्या सकस आणि पौष्टिक अन्नधान्य, फळे व भाजीपाला दूध, दुग्धजन्य पदार्थांचा वापर करून आहार पोषण मुल्यांबाबत परिपूर्ण दक्षता घेतली. तसेच विविध पाककृती सादर केल्या. यात विशेष करून शेवग्याच्या पानांचा पराठा, नाचणीची भाकरी, तांदळाची खीर, माटल्याची भाजी, कुळिथाचे थाली पीठ, अळबडी, तांदळाची भाकरी, विविध सॅलेडचे सादरीकरण केले.

कृषी विज्ञान केंद्रातर्फे ७ ते ३० सप्टेंबरपर्यंत विविध कार्यक्रमाचे आयोजन केले असून, पोषण माहचे उद्दिष्ट साध्य करण्यासाठी विविध विषयांवर वेबिनार सिरीजचे आयोजन करून कुपोषण निर्मूलन, बालकांचे आरोग्य, तसे परसबाग लागवड तंत्रज्ञान याविषयांवरील पुस्तिकेचे प्रकाशन करण्यात आले.

विविध उपक्रमांचा महिलांनी लाभ घ्यावा, असे आवाहन कृषी विज्ञान केंद्राचे समन्वयक डॉ. दिनेश नांद्रे यांनी केले आहे.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक शास्त्रज्ञ जगदीश काथेपुरी यांनी तर सूत्रसंचालन डॉ. आतिष पाटील यांनी केले. आभार कृषी प्रक्रिया अभियांत्रिकीच्या अमृता राऊत यांनी मानले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी रोहितकडून, डॉ. धनराज चौधरी, रमेश शिंदे, कुमार भोये, मधुसूदन अहिरे, जीवन राणे यांनी सहकार्य केले.

Hello Dhule
Page No. 3 Sep 19, 2020
Powered by: erelego.com



# पोषक खाद्यपदार्थांवर स्पर्धा; शंभर महिलांना न्युट्री किट वाटप

### पोषण माह योजनेंतर्गत विज्ञान केंद्रात कार्यक्रम

**प्रतिनिधी** | धुळे

राष्ट्रीय पोषण माह योजनेंतर्गत कृषी विज्ञान केंद्रातर्फे विविध उपक्रम होत आहेत. त्यानुसार जिल्ह्यातील अंगणवाडी सेविका, एकात्मिक बालविकास प्रकल्प अधिकाऱ्यांसाठी पिंपळगाव खुर्द येथे प्रशिक्षण शिबिर झाले. या वेळी शंभर महिलांना न्युट्री गार्डन किट अर्थात परसबागेसाठी बियाण्यांचे वाटप करण्यात आले. तसेच महिलांसाठी पोषक खाद्यपदार्थ तयार करण्याची स्पर्धा घेण्यात आली.

पोषण आहार सप्ताहांतर्गत सकस आहारावर जनजागृती करण्यात येत आहे. त्यानुसार कृषी विज्ञान केंद्रातर्फे पंचायत समिती सदस्य रमेश गांगुर्डे यांच्या हस्ते न्युट्री गार्डनसाठी बियाण्यांचे वाटप केले. महिलांसाठी न्युट्रीथाळी स्पर्धा घेण्यात आली. महिलांनी सकस, पौष्टिक अन्नधान्य, फळे, भाजीपाला, अंडी-मांस, दूध व दुग्धजन्य पदार्थांचा वापर करून पाककृती सादर केल्या. त्यात शेवग्याचा पानांचा पराठा, नाचणीची भाकरी, तांदळाची खीर, माटल्याची भाजी, कुळथाचे पिठले, अळू वडी, तांदळाची भाकरी, विविध प्रकारचे सॅलड आदींचा समावेश होता. अभियानांतर्गत कृषी विज्ञान केंद्रातर्फे ३० सप्टेंबरपर्यंत विविध कार्यक्रम होणार आहेत. त्यात महिलांसाठी विविध विषयांवर वेबिनार, मुलाखत, कुपोषण निर्मूलन, बालकांचे आरोग्य, परसबाग लागवड तंत्रज्ञान या विषयांचा समावेश आहे. या वेळी विषयांवरील पुस्तिका, घडीपत्रिकांचे अनावरण केल्याची माहिती समन्वयक डॉ. दिनेश नांद्रे यांनी दिली. प्रा. जगदीश काथेपुरी यांनी प्रास्ताविक केले. प्रा. डॉ. अतिश पाटील यांनी सूत्रसंचालन केले. अमृता राऊत यांनी आभार मानले. कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी रोहित कडू, डॉ. धनराज चौधरी, रमेश शिंदे, कुमार भोये, मधुसूदन अहिरे, जीवन राणे यांनी प्रयत्न केले.



पोषण माह योजनेंतर्गत न्युट्री किटचे वाटप करताना मान्यवर.